जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAR 2024
तरुण भारत

# विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचे जीवनकार्य समजून घ्यावे

प्रतिनिधी

कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे जीवनकार्य समजून घेण्यासाठी प्रेरित व्हावे, हेच त्यांच्याविषयीच्या चित्ररथाचे खरे प्रयोजन आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

- कुलगुरू डॉ. डी. टी.. शिर्के यांचे आवाहन
- राजर्षी छत्रपती शाहू महाराज चित्ररथाचे विद्यापीठात स्वागत

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्षाच्या निमित्ताने महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित चित्ररथाची निर्मिती करण्यात आली आहे. आज या चित्ररथाचे स्वागत विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर करण्यात आले. यप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, शैक्षणिक, कृषी, क्रीडा, कला, संस्कृती आदी सर्वच क्षेत्रात उत्तुंग कार्याचा डोंगर उभा केला आहे. कोल्हापूरचे ते खरे भाग्यविधाते आहेत. त्यांचे कार्य केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर जगभरात नावाजले जाते. या चित्ररथावर त्यांच्या कार्याची काही क्षणचित्रे पाहावयास मिळतात. पण, त्याही पलिकडे त्यांचे कार्य आहे. ते या निमित्ताने विद्यार्थ्यांनी जाणून घेणे अभिप्रेत आहे. त्यासाठी ग्रंथालयातील राजर्षी विषयीच्या पुस्तकांचे वाचन करावे. तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सोमनाथ पवार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAR 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात १४ मार्चला राजर्षी शाहू संगीत रजनी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्यावतीने १४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता 'राजर्षी शाहू संगीत रजनी'चे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रम राम गणेश गडकरी सभागृहात होणार आहे. याची सांगता १५ रोजी होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. १४ रोजी पहिल्या सत्रात कृष्णा साळुंखे व रोहित खवळे पखवाजरंग हा पखवाजवादनांच्या जुगलबंदी होणार आहे. या व्यक्तीमत्वाचा शोध घेणारा गुणीगोविंद कार्यक्रम होणार आहे. १५ रोजी या संगीत रजनीची सांगता होणार आहे.

0 8 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मॅरेथॉन, रस्सीखेचमध्ये विद्यार्थ्यांचा कस

## डॉ. डेळेकर, जगताप, शेळके यांचे वर्चस्व; चार अधिविभागांना विजेतेपद

### शिवस्पंदन क्रीडा महोत्सव

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन वार्षिक क्रीडा महोत्सवात आज मिनी मॅरेथॉन, रस्सीखेच स्पर्धेत विद्यार्थ्यांचा कस लागला. सकाळी झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेत तुषार शेळके, मनीषा पाटील, डॉ. सागर डेळेकर, डॉ. नीलांबरी जगताप यांनी विविध गटांत प्रथम क्रमांक मिळविला. बास्केटबॉल स्पर्धेत क्रीडा व तंत्रज्ञान अधिविभागांनी, तर रस्सीखेच स्पर्धेत रसायनशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागांनी विजेतेपद मिळविले.

मॅरेथॉनमध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्यासह शालेय विद्यार्थ्यांनीही यामध्ये सहभाग दर्शविला आणि स्पर्धा अविस्मरणीय बनविली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ करून स्पर्धेचा प्रारंभ करण्यात आला. विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोरून स्पर्धेचा प्रारंभ होऊन महिला वसतिगृह, पाच बंगला, दूरशिक्षण केंद्र, क्रीडा अधिविभाग, गेट क्रमांक आठ, परीक्षा भवन, मुख्य प्रशासकीय इमारत, शिवपुतळा प्रदक्षिणा यामार्गे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह असा मॅरेथॉनचा मार्ग होता.

कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या शिवस्पंदन क्रीडा महोत्सवांतर्गत रस्सीखेच स्पर्धेतील रोमहर्षक क्षण.

### विजेते असे...

■ **मॅरेथानमधील विजेत्यांमध्ये तुकाराम मोरे, सोपान घेरडे, जालिंदर बजबळकर, ओंकार येवले, आशितोष माने, प्रेरणा घोडके, तृप्ती इंगळे, स्नेहल खामकर, ऋतुजा पाटील, तेजश्री पाटील, डॉ. सत्यजित पाटील, एस. एन. सपली, एन. जे. वलेकर, ए. डी. गोफणे, एन. एल. तरवाळ, अनुप्रिया तरवाळ, अहोरी कुलकर्णी, भक्ती कुलकर्णी यांचा समावेश आहे. बास्केटबॉल स्पर्धेत पुरुष गटात क्रीडा अधिविभागाने प्रथम, तर तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र अधिविभागाने अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावले. महिलांमध्ये तंत्रज्ञान अधिविभागाने प्रथम, तर अर्थशास्त्र अधिविभागाने द्वितीय क्रमांक पटकावला. रस्सीखेच स्पर्धेत पुरुषांमध्ये रसायनशास्त्र अधिविभागाने अर्थशास्त्र विभागाला पराभूत करीत तृतीय क्रमांक मिळविला, तर महिलांमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाने पर्यावरणशास्त्र विभागाला पराभूत करीत तृतीय क्रमांक मिळविला.**

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAR 2024

महिला दिन विशेष

# शैक्षणिक प्रशासनात महिलांची मोहोर...

## आधुनिक युगात महिलांची पुरुषांच्या बरोबरीने वाटचाल

## शिक्षण क्षेत्रातील टॉपची पदे सांभाळतात सक्षमपणे महिला

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

आजच्या घडीला प्रत्येक क्षेत्रात महिलाचा सहभाग आहे. भविष्यात या सर्व क्षेत्रांचे नेतृत्व करण्यासाठी महिला सज्ज झाल्या आहेत. शैक्षणिक क्षेत्रात आतापर्यंत ज्ञानदानाचे काम करणारी ती आता प्रशासनातही आपल्या कामाचा ठसा उमटवत आहे. विद्यापीठाच्या प्रशासकीय चौकटीत महिलांनी उठवलेली मोहोर लक्षवेधी आहे. देशाच्या सर्वोच्च अशा राष्ट्रपतीपदापासून ते पक्षप्रमुखांपर्यंत महिलांनी राजकारणात मजल मारली आहे. शिक्षण क्षेत्रातही कुलगुरू, प्राचार्य, विभागप्रमुख, महिला संशोधक, मुख्याध्यापक ते शिक्षक संघटनांपर्यंत महिलांचा बोलबाला आहे. शिवाजी विद्यापीठातील बहुतांश अधिविभागाचा गाडा महिलाच चालवतात. अगदी वित्त व लेखाधिकारीही महिलाच आहे. महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील कर्तबगार महिलांचा वेध घेणे महत्वपुर्ण ठरले आहे. महिला संशोधकांचा टक्का दिवसेंदिवस वाढत आहे.

स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण झाली तरी तिचा संघर्ष अद्यापी सुरूच आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंनी दिलेली शिक्षणाची मशाल तिने कायम तेवत ठेवली आहे. प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत आणि त्यानंतर नोकरीसाठी कौटुंबिक, सामाजिक आणि प्रशासकीय पातळीवर तिला झगडावे लागते. तरीही त्या अनंत अडचणींचा सामना करत ठरवलेली गोष्ट पूर्ण केल्यानंतरच स्वस्त बसतात. संसाराचा गाडा हाकत त्या शिक्षणासह अन्य क्षेत्रातही मुख्य पदावर कार्यरत असतात.

शिवाजी विद्यापीठातील अधिविभागप्रमुख, अधिष्ठाता उपकुलसचिव, प्राचार्य आणि शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये मुख्याध्यापक पदावर अनेक महिला कार्यरत आहेत. त्या पदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडत आहेत अधिविभागप्रमुख पदावर बसल्यानंतर विद्यार्थी संशोधन प्रकल्प, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा लागतो. त्यानुसार त्या अधिविभागप्रमुख दिवसरात्र कष्ट करत शैक्षणिकदृष्ट्या गुणवत्ता वाढवण्यावर लक्ष केंद्रीत करतात. म्हणूनच विद्यापीठात बहुतांश महिला संशोधक असून देश-विदेशात त्या संशोधन करतात. गेल्या सहा महिन्यात २५ पेटंटधारकांमध्ये ४ महिलांच्या संशोधनाला पेटंट प्राप्त झाले आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची आव्हाने सक्षमपणे पेलत संशोधन प्रकल्पही स्वतंत्रपणे करण्यात त्या अव्वल आहेत. फेलोशिप मिळवत परदेशात संशोधनासाठी जाण्याचे त्यांचे प्रमाण वाढले आहे. सावित्रीच्या या लेकींनी प्रत्येक क्षेत्रात दबदबा निर्माण केला आहे.



### विद्यापीठासह महाविद्यालयातील कार्यरत महिलांची संख्या

| | |
|---|---|
| अधिविभागप्रमुख | ९ |
| वित्त व लेखाधिकारी | १ |
| उपकुलसचिव | ६ |
| प्राचार्य | ३ |
| मुख्याध्यापक | २० टक्के |
| पीएच. डी. | १२० |
| पेटंटधारक | १० |

### शासनाचे स्वतंत्र प्रोजेक्ट

डॉ. ज्योती जाधव यांनी गुळावर संशोधन करून कोल्हापूरचा गुळ कसा दर्जेदार आहे, याची प्रचिती देश विदेशात करून दिली आहे. जागतिक संशोधकांच्या यादीत त्यांच्या संशोधनाचा समावेश आहे.

### विद्यार्थिनींना सुवर्णपदक

गुणवत्तेच्या जोरावर राष्ट्रपती सुवर्णपदक व कुलपती सुवर्णपदकाचा बहुमानही महिलांनीच मिळवला आहे. यंदा क्रीडा क्षेत्रात तर 'खेलो इंडिया'तही विद्यापीठासह महाविद्यालयांच्या विद्यार्थिनींनी सुवर्ण व रौप्यपदकावर आपली मोहोर उमटवली आहे.

### महिला विभागप्रमुख

विद्यापीठातील जीव रसायनशास्त्र व जैव तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. ज्योती जाधव, पर्यावरण विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव, वृत्तपत्रविद्या संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा मुढे पवार, शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिभा पाटणकर, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार, गणित अधिविभागप्रमुख डॉ. सरिता ठकार, अर्थशास्त्र डॉ. विद्या कट्टी, संगणकशास्त्र डॉ. कविता ओझा, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, लेखा व वित्त अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, उपकुलसचिव डॉ. विभा अंतरेड्डी, एस. एस. आडसुळे, बी. एम. नाळे, ॲड. ए. ए. कदम, दुर्गाली गायकवाड, प्रिया देशमुख, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, प्राचार्य डॉ. बोजना जुगळे, डॉ डी. डी. इंगळे यांनी केलेल्या कष्टाला यशाची फुले लागल्याने त्या विद्यापीठातील टॉपच्या पदावर सध्या कार्यरत आहेत.

08 MAR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नैसर्गिक पद्धतीने काथ बनविण्याचे संशोधन

## गायत्री गोखलेला साऊथ आफ्रिकन पेटंट : शिवाजी विद्यापीठाची पेटंट ब्रँड ॲम्बेसिडर

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

कोकणासह इतर ठिकाणी काही प्रमाणात सुपारीच्या सालीपासून काथ केमिकल पद्धतीने बनवला जातो; मात्र शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील गायत्री गोखले हिने संशोधन करून नवीन पर्यावरणपूरक पद्धतीने व शेतकऱ्याच्या शेतातील साधने वापरून काथ बनवला आहे. या संशोधनामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चामध्ये जास्त फायदा होऊ शकतो.

गायत्री गोखले ही मूळची आचरा (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग) येथील आहे. ती शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात बी. टेक. (मेकॅनिकल इंजिनिअरिंग) तृतीय वर्षात शिकत आहे. तिने सुपारीच्या सालापासून काथ बनवण्याच्या नैसर्गिक पद्धतीवर संशोधन केले आहे. त्यामध्ये सुपारीच्या काथाची निर्मिती नैसर्गिक घटक पाणी, माती, शेण वापरून केली आहे.



> विद्यार्थ्यांनी एक तरी पेटंट करण्याचा प्रयत्न करावा. पेटंटच्या माध्यमातून एखादा उद्योगदेखील उभा राहू शकतो. याची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठात पेटंट दूत म्हणून काम करण्याची संधी मिळाली. नैसर्गिक पद्धतीने काथ बनविण्याबाबत अधिकचे संशोधन सुरू आहे. शेतकऱ्यांसाठी काहीतरी चांगले करण्याचा मानस आहे. **- गायत्री गोखले, संशोधक विद्यार्थिनी**

**महिला दिन विशेष**

कोकण नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध प्रदेश आहे. येथे आंबा, फणस, नारळ, सुपारी यासारखी अनेक पिके घेतली जातात. त्यामधील सुपारी हे प्रमुख पीक आहे. ज्याप्रकारे नारळाच्या काथ्याचे अनेक उपयोग आहेत, त्याच प्रकारे सुपारीचा काथ अनेक ठिकाणी वापरला जाऊ शकतो. कोकणातील लोक सुपारीची साल जाळून टाकतात. त्यापेक्षा त्याच्या काथ बनवल्यास उत्पन्नाचे साधन होऊ शकते.

सध्या काही प्रमाणात सुपारीचा काथ केमिकल पद्धतीने बनवला जातो. संशोधन केलेल्या नवीन पद्धतीत पर्यावरणपूरक पद्धतीने व शेतकऱ्याच्या शेतातील साधने वापरून काथ बनवला आहे. याचा वापर करून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फायदा होऊ शकतो. यासंदर्भात जानेवारी २०२३ मध्ये पेटंटसाठी ऑनलाईन प्रस्ताव पाठवला होता. जून महिन्यात यास आंतरराष्ट्रीय स्तरावरील साऊथ आफ्रिकन पेटंट मिळाले आहे. संशोधन कार्यात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे, तंत्रज्ञान अधिविभाग प्रमुख डॉ. एस. एन. सपली यांच्यासह डॉ. महेश गोखले, डॉ. निरंजना चव्हाण, डॉ. संतोष मधाळे, डॉ. अजित तलवे, डॉ. प्रिया पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 MAR 2024
पुढारी

## परसाईंचे साहित्य समाज सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण

कोल्हापूर : हिंदीचे प्रसिद्ध लेखक हरिशंकर परसाई यांचे साहित्य समाज सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण असल्याचे मत समीक्षक डॉ सुरेश माहेश्वरी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाच्यावतीने वि. स. खांडेकर भाषा भवन येथे आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील होते.